पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- २८/०३/२०२१*

# नक्षलवाद्यांचा घातपाताचा कट उधळुन लावण्यात गडचिरोली पोलीस दलास यश

- **मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य मिळुन आले.**

उपविभाग कुरखेडा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र **मालेवाडा** हद्दीत नक्षलवादी मोठया प्रमाणात एकत्र आले असुन ते दरवर्षी नक्षल्यांकडून पाळल्या जात असलेल्या टिसीओसी नक्षल सप्ताहाच्या पार्श्वभुमीवर घातपात करण्याची शक्यता असल्याची गोपनिय माहिती मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़ो. यांना मिळाली. गोपनिय माहिती वरून मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़ो. यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. मनीष कलवानीया सा़ो. यांच्या नेतृत्वाखाली मौजा खोब्रामेंढा, हेटाळकसा जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलातील सी-६० चे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना दिनांक २७/०३/२०२१ रोजी सकाळी ७:०० वाजताच्या सुमारास जंगलात तीन वेगवेगळया ठिकाणी दबा धरून बसलेल्या ६० ते ७० नक्षलवादयांनी सी-६० जवानांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने जवांनाच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल व स्वंरक्षणासाठी जवानांनी नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी सुमारे ६० ते ७० मिनीटे चाललेल्या चकमकीनंतर पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळुन गेले.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात सी-६० जवानांनी शोध अभियान राबविले असतांना घटनास्थळी ठिकठिकाणी रक्ताचे डाग दिसुन आले. त्यावरुन सदर चकमकी दरम्यान एक नक्षलवादी गंभीर जखमी झाल्याची शक्यता आहे. सदर घटनास्थळी एक ३०३ रायफल मॅग्झीन काडतुसासह, नक्षल पिट्टु, ३ नग प्रेशर कुकर बॉम्ब, नक्षल डांगरी ड्रेस, दोन सोलर प्लेट, वायर बंडल, सुतळी बॉम्ब, तसेच मोठया प्रमाणात औषधी साठा व नक्षलवादयांच्या दैनंदिन वापराचे साहित्य मिळुन आले. मिळुन आलेल्या ३ नग प्रेशर कुकर बॉम्ब हे बिडीडीएस पथकाच्या साहाय्याने घटनास्थळीच नष्ट करण्यात आले.

सी-६० कमांडोच्या या शौर्यपुर्ण कामगिरीचे मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़ो. यांनी कौतुक केले आहे. त्याचबरोबर नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

